# यावल महाविद्यालयात भूगोल मंडळाचे उद्घाटन व दीपोत्सव उत्साहात साजरा

यावल( प्रतिनिधी) येथील ज.जि.म.वि. प्रसारक सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भूगोल मंडळ व दीपोत्सव उद्घाटन उत्साहात करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणशास्त्र महाविद्यालय,जामनेर येथील प्रा.एस.बी.जमधडे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी भूषविले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भूगोल विभागातील प्राध्यापक नरेंद्र पाटील यांनी भूगोल मंडळ व दीपोत्सव उद्घाटन संदर्भात भूमिका विशद केली. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी प्रा.एस.बी. जमधडे यांनी विचार व्यक्त केले की आपले सर्व सण उत्सव हे भूगोलाशी संबंधित आहेत. दीपावली महोत्सव हा प्रकाशाचे महत्त्व सांगतो बाह्य प्रकाशा एवढाच मनातील प्रकाशही महत्त्वाचा असतो. यावेळी डॉ.सुधीर कापडे यांनी दीपोत्सवाची माहिती दिली.तर अध्यक्षीय भाषणात डॉ. संध्या सोनवणे यांनी प्रतिपादन केले की भूगोल विषयाला स्पर्धा परीक्षेत महत्त्वाचे स्थान आहे प्रत्येक विद्यार्थ्याने भूगोल अभ्यासायला हवा. सुबक रंगीत रांगोळया, रंगीबिरंगी देवी,किल्ला सजावट याची अतिशय सुंदर व आकर्षक सजावट करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची गुजर हिने केले तर आभार तेजश्री कोलते हिने मानले. कार्यक्रमास प्रा.ए.पी.पाटील,प्रा.एम.डी. खैरनार, डॉ.आर.डी.पवार तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी

डॉ.पी.व्ही.पावरा,समाधान कोळी,गौरव कुंभार,टिनू पाटील,नोमेश्वर तायडे, मिलिंद बोरघडे यांनी परिश्रम घेतले.सदर उत्सवास अनेक विद्यार्थी उपस्थित होते.



दैनिक भास्कर

2022-10-25

भुसावळ (2)

मार्गदर्शन • यावल येथील महाविद्यालयात प्रा.संजय जमदाडे यांचे प्रतिपादन

# भूगोलाविना वर्तमान बनते अंधारमय

प्रतिनिधी | यावल

आज जगात कुठेही जाताना कोणाला न विचारता जीपीएसद्वारे आपण कुठेही पोहोचू शकतो. हे तंत्र भूगोलातूनच अवगत करता आले आहे. प्रत्येकाने भूगोलाच्या अभ्यास केलाच पाहिजे, तो आपल्या जीवनाच्या प्रगतीचा मार्ग ठरू शकतो. इतिहास माहित नसेल तर भविष्य आणि भूगोल माहित नसल्यास वर्तमान अंधकारात जाऊ शकते, अशी भूगोलाची व्याख्या आहे, असे प्रतिपादन जामनेर महाविद्यालयाचे भूगोल प्रमुख प्रा.संजय जमदाडे यांनी केले.

यावल महाविद्यालयात भूगोल मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते मंगळवारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे होत्या. विद्यार्थ्यांना भूगोल विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. जमदाडे यांनी सांगितले की, पृथ्वीचे अस्तित्वापासून भूगोल अस्तित्वात आहे. मानवी जीव पंचमहाभूत पासून तयार होतो. यात भूगोल अर्थात भू देखील आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी भूगोलच्या ज्ञानातून नकाशा तंत्र अवगत केले होते. स्पर्धा परीक्षेची तयारी करा, त्यात तुम्हाला भूगोलाचे अनेक प्रश्न असतील, असे मार्गदर्शन त्यांनी केले. या कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा. ए.पी. पाटील, प्रा. एम.डी. खैरनार, भूगोल विभागाचे प्रमुख प्रा. नरेंद्र पाटील, प्रा.डॉ. एस. पी. कापडे, एन. एस. एस. प्रमुख प्रा. आर. डी. पवार, प्रा. डॉ.पी. व्ही. पावरा उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नरेंद्र पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्राची पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार तेजश्री कोलते हिने मानले. यशस्वीतेसाठी मिलिंद बोरघडे, प्रमोद कदम, संतोष ठाकूर, अनिल पाटील, अमृत पाटील, प्रमोद जोहरे, सचिन बारी, यतीन पाटील आदींनी परिश्रम घेतले. महाविद्यालयात दीपोत्सवानिमित्त चेतना कोळी या विद्यार्थिनीने 'ऊन सावल्या, येतील जातील' ही कविता सादर केली.

### नवनवीन कौशल्ये अंगीकारा : प्राचार्या डॉ.सोनवणे

महाविद्यालयात शिक्षण घेताना कलागुणांना वाव मिळतो. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी कला अवगत करावी. त्यात कौशल्य मिळवून आपली एक वेगळी ओळख निर्माण करावी. भूगोल विषयाच्या माध्यमातून आपल्या परिसरासह राज्य, देश पातळीवरील भौगोलिक माहिती आपण ठेवली पाहिजे, असे प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी सांगितले.